# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२२

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक १७.०१.२०२२

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला येथील स्टेट बॅंक शाखेत चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना शिताफीने अटक

---

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला येथील स्टेट बॅंक शाखेत चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना शिताफीने अटक डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला येथील स्टेट बॅंक शाखेमध्ये दि.२५/१२/२१ ते दि. २६/१२/२१ च्या दरम्यान अज्ञात आरोपीत यांनी बॅंकेचे ग्रील तोडुन बॅंकेत प्रवेश करून गॅस कटरच्या साहाय्याने बॅंकेमधील तिजोरी तोडण्याचा प्रयत्न केला होता.सदर घटनेबाबत एम.आय. डी.सी.पोलीस ठाणे अकोला येथे गु.र.क्र. ८७७/२०२१ भा.द.वि कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ अन्वये अज्ञात आरोपीतांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयामध्ये सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आलेले गुन्हयातील पाहीजे आरोपी हे पेठपाडा गाव,खारघर,जि.रायगड या ठिकाणी येणार असल्याची माहिती सपोनि निलेश पाटील, गुन्हे शाखा,कक्ष-१, वाशी नवी मुंबई यांना मिळाली होती.त्या अनुषंगाने वपोनि. श्री सुनिल शिंदे, सपोनि.निलेश पाटील, पोहवा/१०३१/रोहिदास पाटील,पो.ना. /२६८३/शशिकांत जगदाळे,पो.ना/२८८३/निलेश किंद्रे, पोना/२०४९/दिपक मोरे, पो. शि./३०७७/उत्तरेश्वर जाधव,पो.शि/३८४३/विशाल सावरकर यांच्या पथकाने पाहिजे आरोपी येणार असल्याच्या ठिकाणाची रेकी करून सदर ठिकाणी ३ ते ४ तास सापळा लावून दि१६/०१/२०२२ रोजी पेठपाडा गाव,खारघर,जि.रायगड येथून दोन संशयित इसमांना शिताफीने ताब्यात घेतले.

**ताब्यात घेतलेल्या इसमांची नावे खालीलप्रमाणे**

१) सौदागर फाजुल शेख वय-३६ वर्षे,धंदा-बेकार. रा.स्वत:चे घर,कुर्बानी टोला,पो. रहिमपुर,पो.ठाणे माणिकचौक,जि.मालदा,राज्य पश्चिम बंगाल

२) शेरशहा रब्बुल शेख वय- ४५ वर्षे,धंदा -बेकार. रा.कच्छुआकोल नारायणपुर,पो. हिनसिंग टोला,पो.ठाणे राजमहल,जि.साहेबगंज,राज्य झारखंड.

नमूद संशयीत इसमांकडे एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे अकोला गु.र.क्र. ८७७/२०२१ भा.द.वि कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ या गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी सदरच्या गुन्हयाची कबुली दिली आहे.सदरचे आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांच्यावर विविध राज्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली आहे

**१) सौदागर फाजुल शेख याचेवर पश्चिम बंगाल या राज्यात खालील गुन्हे दाखल आहेत.**

१) इंग्लिश बझार पो ठाणे गु.र.नं. ७६१/२०१४ भा.दं.वि. ३९५,३९७ आर्म ॲक्ट २५,२७

२)माणिकचौक पो ठाणे गु.र.नं. ४१०/२०१४ भा.दं.वि. ३७६(२)(फ) पोक्सो ॲक्ट ४,६,८,१०

नमूद आरोपींना पुढील तपासकामी एमआयडीसी पोलीस ठाणे अकोला यांच्या पोलीस पथकाच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री.बिपीनकुमार सिंह, मा. सह पोलीस आयुक्त, डॉ. श्री. जय जाधव, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री सुरेश मेंगडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे करण्यात आली आहे.

**उत्कृष्ट कामगिरी, तांत्रिक तपास व आरोपीस अटक करणारे पथक-**

गुन्हे शाखा,कक्ष-१, चे १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल शिंदे, २) सहा. पोलीस निरीक्षक निलेश पाटील पो.हवा/१०३१ रोहिदास पाटील,पो.ना./२६८३ शशिकांत जगदाळे, पो.ना/२८८३ निलेश किंद्रे, पोना/२०४९ दिपक मोरे, पो.शि./३०७७ उत्तरेश्वर जाधव,पो.शि/३८४३ विशाल सावरकर यांनी उत्कृष्ठ कामगिरी केली आहे.

------------